# जाहीर नोटीस

दि. ०२/०५/२०२५

सदर नोटीसी द्वारे आपणास कळविण्यात येते की, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, सिंधुदुर्ग यांच्या अधिनस्त असलेल्या जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, कणकवली सिंधुदुर्ग या कार्यालयाकडून जिल्ह्यातील पशुवैद्यकीय संस्थांना महिन्यातून एकदा द्रवनत्र रेतमात्रा इत्यादीची पुरवठा वाहतूक करणेसाठी एक वर्षाचा भावबंद करार कालावधीसाठी खाजगी वाहतूक करणाऱ्या ठेकेदारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर दरकरार दिनांक ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ या कालावधी साठी असुन तरी इच्छुक पुरवठादार यांनी आपली दरपत्रके दि. १४/०५/२०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मोहोरबंद लिफाफ्यात सादर करावी. दरपत्रके दि.१५/०५/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, सिंधुदुर्ग येथे नियुक्त समिती समोर उघडण्यात येतील व वाहतुकीचा कमीत कमी दर नमूद केलेल्या पुरवठादार यांना पुरवठा आदेश देण्यात येतील. अधिक माहितीसाठी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, सिंधुदुर्ग येथे संपर्क करावा. या बाबतचा तपशील कार्यालयाच्या तांत्रिक शाखेत उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | तपशील | वाहनाचा प्रकार व क्षमता |
|---|---|---|---|
| १. | जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, कणकवली सिंधुदुर्ग व जिल्ह्यातील इतर पशुवैद्यकीय संस्थांना लागणारे द्रवनत्र तसेच पुणे येथुन विर्यमात्रा उचल व इतर वाहतुकीची अनुषंगिक कामे. | मासिक फ़िरती अंदाजे १८०० – १९०० किमी | T.A. ५५ आकारची २०-२५ द्रवनत्र पात्रे बसतील अश्या क्षमतेचे वाहन किंवा तत्सम प्रकाराचे |

१. दरपत्रके सादर करताना अधिकृत लेटर हेड वरच सादर करावेत.
२. दरपत्रके सीलबंद लिफाफ्यात सादर करावे.
३. दरपत्रके १० दिवसांच्या आत सादर करावे.
४. दर सर्व करासहित असावेत.
५.GST प्रमाणपत्रदरपत्रकासोबत सादर करावे.
६. वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे, आधार कार्ड, PAN कार्डसोबत सादर करावे.

संपर्क साठी पत्ता:- दुरध्वनी क्र. ०२३६२-२२८८०८
ई-मेल पत्ता :- ddcahsindhudurg@gmail.com

(डॉ. समीर चंद्रकांतराव बिलोलीकर)
जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन
सिंधुदुर्ग

Scanned with OKEN Scanner

## दरपत्रके सादर करण्याची पद्धत

**लिफाफा क्र.१ :-**

१. वाहनाचा प्रकार व क्षमता — T.A. ५५ आकारची २०-२५ द्रवनत्रे पात्र बसतील असे तत्सम प्रकाराचे किंवा त्या पुढील क्षमतेचे वाहन.
२. वाहन चालकाचा परवाना.
३.वाहन नोंदणी प्रमाणपत्र
४. वाहतूक ठेकेदाराची आधार कार्ड व PAN कार्डची छायांकित प्रत तसेच GST क्रमंक लागू नसल्यास तत्सम सक्षम प्राधिकरणाकडील प्रमाणपत्र दरपत्रकासोबत असावेत.
५. वाहनाच्या विमा पॉलीसीची छायांकित प्रत.
६. वाहनकर पुस्तिका, पंजीकृत नोंदणीपुस्तिका (रजिस्ट्रेशनबुक ) तसेच फिटनेस प्रमाणपत्र व वाहतूकीचा नुतनीकरण परवाना यांच्या सांक्षाकिंत प्रती.
7. पीयुसी चे प्रमाणपत्र

**लिफाफा क्र.२:-**

व्यापारी लिफाफा — सदर लिफाफ्यामध्ये ठेकेदाराने आपल्याकडील अपेक्षित दर नमूद करावे.

| अ.क्र. | वाहतुकीचा तपशील | परिमाण | दर(रु./पैसे) |
|---|---|---|---|
| १ | द्रवनत्र व विर्यमात्रा वाहतूक करणे | १ किमी | |

## सर्वसाधारण अटी व शर्थी :-

१. सदर दरकरार दिनांक ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ या कालावधी साठी असुन दरपत्रक दाखल करु इच्छूक पुरवठादारास नमुना दाखल द्रवनत्रपात्र पाहण्यासाठी जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र कणकवली जानवली येथे कार्यालयीन वेळेत उपलब्धराहील.त्यामध्ये -१९६° सेंटीग्रेड इतक्या थंडद्रवाची वाहतूक अतिशय काळजीपूर्वक करणे आवश्यकआहे.अशा एका भरलेल्या द्रवनत्रपात्राचे वजन अंदाजे ५० कि.ग्रॅ.इतके असते.
२. दरपत्रक कालावधीत वाहन सुस्थितीत असणे आवश्यक आहे. वाहनातील द्रवनत्रपात्रे ठेवण्याची जागा जाड चटईने आच्छादलेली असणेआवश्यक आहे.द्रवनत्रपात्रांचे ऊन, वारा, पाऊस यापासून संरक्षण व्हावे म्हणुन वाहनांवर योग्य उंचीचे हुड आणि त्यावर ताडपत्री सुस्थीतीत बांधलेली असणे आवश्यक आहे.वाहतुक करताना द्रवनत्रपात्रे ठेवण्यासाठी वाहनामध्ये योग्य उंचीवरअँगल लावून, दिड इंच जाडीच्या लाकडी फळया ठेकेदाराने स्वत:च्या खर्चाने बसवावयाच्या आहेत.
३. वाहनाची मागील बाजू बंद करता यावी.मागील बाकावर पेटी नसावी.
४. प्रत्येक फेरीच्या वेळी सांगितले जाईल त्याप्रमाणे वाहन उपलब्ध करुन द्यावी लागेल.तसेच पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र सिंधुदुर्ग सांगतीलत्या प्रमाणे इतर साहित्य सुध्दा सोबत न्यावे लागेल.
५. वाहतूक कंत्राट दाराने वाहतूकीचा दर सर्व करासहीत प्रतिकि.मी. चा दिला पाहिजे.यासाठी वाहनाचे मिटर चालू स्थितीत असणे आवश्यक आहे. यामध्ये मुक्कामासाठी आकारणी करता येणार नाही. वाहतूक कमीतकमी अंतराच्या परंतु चांगल्या मार्गाने करावी लागेल.

Scanned with OKEN Scanner

६. कंत्राटदाराने वाहनाची देखभाल, दुरुस्ती राज्यतंर्गत किंवा राज्याबाहेरील कर अगर इंधन इत्यादीसाठी खर्च स्वत:करावयाचा आहे.द्रवनत्र वाहतूक करतांना टोल टॅक्स द्यावा लागल्यास त्याचाही खर्च कंत्राटदाराने करावयाचा असून अशा कुठल्याही खर्चाची प्रतीपूर्ती शासनाकडून केली जाणार नाही.

७. कंत्राटदाराने द्रवनत्र वाहतूक करते वेळी कंत्राटदाराचे प्रतिनिधी तसेच या कार्यालयाचे प्रतिनिधी वाहना सोबत न्यावे लागतील व त्यांची सोईस्कर आसन व्यवस्था वाहनात असली पाहीजे.वाहन चालकाकडे पुरेशा क्षमतेची टॉर्च असणे आवश्यक आहे.

८. कंत्राटदाराचे प्रतिनिधीने गाडीतील रिकामी द्रवनत्रपात्रे खाली उतरवून द्रवनत्र भरणे तसेच भरलेली द्रवनत्रपात्रे गाडीत चढवणे तसेच कृत्रिम रेतन उपकेंद्रांना द्रवनत्र पात्रात ओतून देणे इत्यादी कामे अशा पध्दतीने करावी की द्रवनत्र सांडणार नाही आणि द्रवनत्र पात्रांनाही इजा होणार नाही.याकामासाठी वेगळी अदायगी केली जाणार नाही.

९. यानिविदेत नमूद कामासाठी कुठल्याही प्रकारचे अग्रिमधन मंजूर केले जाणार नाही.

१०. द्रवनत्र वाहतूकीच्या दरासमंजूरी प्राप्त झाल्यानंतर त्यामध्ये अपवादात्मक कारणाशिवाय कालावधीत वाढ करता येणार नाही परंतु कोणत्याही कारणासाठी दरवाढ केली जाणार नाही.

११. पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, कणकवली जिल्हा सिंधुदुर्ग यांनी दिलेल्या कार्यक्रमाप्रमाणे वाहन संबंधित दिवशी विहीत वेळेवर उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास बाजारातून उपलब्ध दराने पर्यायी वाहनाची व्यवस्था केली जाईल व संबंधीत सर्व खर्च कंत्राटदाराच्या सुरक्षाठेव / वाहतुक देयकातुन वसूल केला जाईल.

१२. वाहतूकीच्या सुरुवातीस जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, कणकवली जिल्हा सिंधुदुर्ग येथून रिकामी द्रवनत्रपात्रे नेवून ती पुरवठयाच्या ठिकाणातून भरुन आणावी लागतील व नंतर जिल्हयातील संस्थांना द्रवनत्र पुरवावे लागेल. द्रवनत्र वाहतूक संपले नंतर दरमहा कंत्राटदाराने देयक सादर करावयाचे राहील. सर्वसाधारण अंतराचा अंदाज घेऊन तसेच द्रवनत्र पुरवठयाचे अंतिम ठिकाण्याचे अंतराचे अंदाज घेऊन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सिंधुदुर्ग हे अंतिम मंजूरी देतील.त्यानुसार रक्कम अदा केली जाईल.

१३. पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, कणकवली जिल्हा सिंधुदुर्ग यांनी दिलेल्या कार्यक्रमानुसार द्रवनत्र आणणे, उपकेंद्रांना पुरविणे किंवा जिल्हा कृत्रिम रेतनकेंद्र, कणकवली जिल्हा सिंधुदुर्ग येथून उपकेंद्रांना पुरवठा करुन रिकामी भांडी परत आणण्यासाठी कंत्राटदार याने वेळेवर कार्यवाही करणे आवश्यक राहील.

१४. रिकामी द्रवनत्र पात्रे जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, कणकवली जिल्हा सिंधुदुर्ग येथून कंत्राटदाराचे ताब्यात दिली जातील. तेथून कंत्राटदाराने ताबा घेऊन निर्देशित ठिकाणी जावून तेथून द्रवनत्र भरुन आणून, दिलेल्या कार्यक्रमाप्रमाणे द्रवनत्र उपकेंद्रांना पुरवठा करुन रिकामी द्रवनत्रपात्रे जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, कणकवली जिल्हा सिंधुदुर्ग येथे आणून सुस्थितीत ताब्यात द्यावी लागतील. (रिकाम्या एका द्रवनत्रपात्राची किंमत रु. १५,०००/- ते २०,०००/- इतकी आहे.)

१५. वाहतूकीच्या वेळी प्रवासात ताब्यातील द्रवनत्रपात्राचे नुकसान होणार नाही याची जबाबदारी कंत्राटदाराने घ्यावयाची आहे. प्रवासात द्रवनत्रपात्राचे, द्रवनत्राचे नुकसान कुठल्याही कारणाने झाल्यास आणि मनुष्यहानी झाल्यास त्यास कंत्राटदारास जबाबदार धरुन शासकीय नियमानुसार त्याची वसूली कंत्राटदारा कडून केली जाईल.

१६. द्रवनत्र आणणे, सिंधुदुर्ग जिल्हयातील उपकेंद्रांना वाटप करणे, तसेच पशुसंवर्धन खात्यातील इतर कामासाठी महाराष्ट्र राज्यात किंवा इतर राज्यात जाण्यास वाहन मागीतल्यास वाहन उपलब्ध करुन

Scanned with OKEN Scanner

देणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. इतर राज्यात वाहन न्यावे लागल्यास त्यासाठी येणारा परवाना खर्च व इतर कोणतेही कर याचा खर्च हा कंत्राटदाराने करावयाचा आहे. सदर खर्च शासनाकडून कंत्राटदारास अदा केला जाणार नाही.

१७.वाहन द्रवनत्र पुरवठा करण्याचे कामासाठी असता कंत्राटदारास द्रवनत्रपात्रा व्यतिरिक्त इतर खाजगी सामान तसेच खात्याचे प्रतिनिधी व्यतिरिक्त इतरखाजगी इसमांची वाहतूक करता येणार नाही.

१८.दरकरार मंजूर झालेल्या कंत्राटदारास रुपये १५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र ) अनामत रक्कम म्हणून धनादेशाने जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सिंधुदुर्ग जिल्हा सिंधुदुर्ग यांचेकडे देणे आवश्यक राहील.

१९. कंत्राटदारानेरुपये २००/- (रुपये दोनशे मात्र) चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल. हा करारनामा त्यांच्या दोन छायांकित प्रतीसह जिल्हा पशुसवर्धन उपआयुक्त, सिंधुदुर्ग, जि.सिंधुदुर्ग यांचेकडे द्यावयाचे राहील. मंजूर झालेल्या दरपत्रक धारकाने करारनामा करतांनाच नियम व अटी प्रमाणे वाहन,तयार करुन समक्ष दाखविल्याशिवाय करारनामा केला जाणार नाही.

२०.सदर दरकरार दिनांक ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ या कालावधी साठी असुन ३१/०३/२०२६ नंतर पुढील कालावधीसाठी दरपत्रक प्रक्रिया पुर्ण होऊन अंतिम दर निश्चितीस मंजूरी मिळेपर्यंत कंत्राटदाराने जुन्या दरानेच वाहतुक करणे बंधनकारक राहील.

२१. दरपत्रक मंजूर झालेल्या दरपत्रक धारकाने दिलेल्या मुदतीत अनामत रक्कम रुपये १५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) सरकारी खजिन्यात भरणा न केल्यास बयाणा रक्कम रु.१०,०००/- (अक्षरी दहा हजार मात्र) जप्त करुन मंजूर झालेली दरपत्रक नामंजूर समजण्यात येईल.

२२.कंत्राटदाराला यापासून होणा-या उत्पन्नावर शासकीय नियमानुसार प्राप्तीकर (Income Tax-TDS) भरावा लागेल. कंत्राटदाराला यापासून दिल्या जाणा-या अदायगीतून च शासकीय नियमानुसार प्राप्तीकर (Income Tax-TDS) व GST कापून घेतले जाईल.

२३.पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, कणकवली जिल्हा सिंधुदुर्ग यांना कंत्राटदाराचे वाहतूकीचे काम समाधानकारक नाही असे आढळून आल्यास तो कंत्राट काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आलेला आहे. कंत्राटदारा विरुध्द अशी कार्यवाही करावी लागल्यास त्याची अनामत रक्कम ही जप्त करण्यात येईल व शासकिय नियमानुसार कार्यवाही केली जाईल.

२४. दरपत्रकातील दर एक समान असल्यास याबाबत मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सिंधुदुर्ग यांचे मार्गदर्शनानुसार तसेच वाहनाचा प्रकार वाहतूक क्षमता पाहून समिती अंतिम निर्णय घेईल व ती सर्वांना बंधनकारक असेल.

२५. कंत्राट संबंधी काही विवाद निर्माण झाल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा.जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सिंधुदुर्ग यांना राहणार असून, असे निर्णय कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.

२६. वाहतूक करतांना कंत्राटदाराचे प्रतिनिधींनी काही गैरप्रकार केल्यास त्याचीज बाबदारी कंत्राटदारावर राहील व त्याचे विरुध्द शासकिय नियमानुसार कार्यवाही केली जाईल.

२७. निर्देशित अटींचे व नियमांचे उल्लंघन झाले असे आढळून आल्यास कंत्राटदाराकडून कंत्राट काढून घेतले जाईल. शासनाने घालून दिलेल्या वाहतूक संबंधीच्या नियम व अटी कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.

२८.कंत्राट स्विकारलेनंतर केव्हाही मध्येच सोडल्यास भरलेली अनामत रक्कम रुपये १५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) जप्त करण्यात येईल. तसेच त्याकारणाने नव्याने दरपत्रक करावी

Scanned with OKEN Scanner

लागल्यास "आणि/अगर" पर्यायी व्यवस्था करुन जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, कणकवली जिल्हा सिंधुदुर्ग यांना जादा खर्च करावे लागल्यास जादाची सर्व रक्कम कंत्राटदाराने भरुन द्यावी लागेल.

२९. ज्या कंत्राटदाराचे कंत्राट मंजूर होईल (ते बाहेरगावचे जरी असतील तरी सुध्दा) त्यांनी स्वत:चा पत्ता व दूरध्वनी क्रमांक व्यतिरिक्त सिंधुदुर्ग येथील संपर्क पत्ता व दूरध्वनी क्रमांकही देणेआवश्यक राहील.

३०. द्रवनत्र व इतर वाहतूकीच्या वेळी अपवादात्मक परिस्थितीत माल मिळण्यास काही विलंब झाल्यास त्याबद्दल मुक्कामी भत्ता (हॉल्टींगचार्जेस) मिळणार नाही.

३१. ठरवून दिलेल्या दिवशी द्रवनत्र आणणे, वाटप करणे वा इतर कामी कंत्राटदाराने सुस्थितीतील वाहन विहित दिवशी विहित वेळेवरउपलब्ध न करुन देता उशीर केल्यास त्याच्या कडून दर दिवशी रुपये १०००/-(रुपये एक हजार) मात्र या दराने दंड आकारणी करण्यात येईल.

३२. वाहन उपलब्ध करुन देण्याबाबत दरपत्रक धारकास साधरणत: २४ तास अगोदर सूचना देण्यासाठी त्यांनी या कार्यालयाच्या संपर्कात रहाणे आवश्यक आहे.जर सूचना देऊन ही वाहन उपलब्ध न झाल्यास, दरपत्रक धारकास दैनिक रुपये १०००/- (अक्षरी रुपये एक हजार फक्त) प्रमाणे दंड आकारला जाईल तसेच या पुढील पाच वर्षापर्यंत याकार्यालयाने मागविलेल्या वाहतूक दरपत्रकांसाठी त्यास सहभागी होण्यास परवानगी दिली जाणार नाही.

३३. वेळोवेळी शासकीय नियमातील व शासकीय कार्यालयातील काही बदलांमुळे दिल्या जाणा-या सूचना व अटींचे पालन निविदाधारकास करावे लागेल.

३४. वाहतूक करीत असताना निविदाधारक अथवा त्याचे प्रतिनिधीकडून कोणत्याही प्रकारचा वाहन परिवहन किंवा पोलीस खात्याच्या कायद्याविषयक नियमांचे उल्लंघन झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी दरपत्रकधारकावर राहील. वाहन जप्त झाल्यास अथवा कार्यवाहीसाठी खोळंबून राहिल्यास वाहतुकीसाठी दुसरे पर्यायी वाहन तातडीने उपलब्ध करुन देणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

३५. वाहनाचे मीटर सुस्थितीत असणे आवश्यक आहे. वाटेतच किलोमीटर रिडींग बंद पडल्यास त्याच मार्गावरील मागील वाहतुकीचे किलोमीटर ग्राहय धरले जाईल. परंतु कंत्राटदाराने तातडीने मीटर चालू करून घेणेअनिवार्य राहील.

३६. संपूर्ण दरपत्रक स्विकारणे, मंजूर करणे किंवा रद्द करणे किंवा कोणतेही कारण न दाखविता अमान्य करणे वगैरे सर्व अधिकार दरपत्रक समितीस राहतील व समितीचा निर्णय दरपत्रक धारकास बंधनकारक राहील.

३७. या कार्यालयाने ठरवून दिलेल्या मार्गानेच वाहतुक करणे बंधनकारक राहील अथवाअपवादात्मक परिस्थितीत वाहनांसोबत असणा-या अधिका-याचा निर्णय अंतिम राहील.

३८. दरपत्रक उघडल्यानंतर प्रथम व द्वितीय क्रमांकावर असलेल्या दरपत्रक धारकांच्या बयाना रक्कम एक महिन्याचे आत परत करण्यात येतील व इतरांचे बयाना रक्कम ताबडतोब परत करण्यांत येतील.

३९. द्रवनत्र वाहतुकीचे वेळी वाहतुक मार्गात उपकेंद्रांचे गावात व द्रवनत्र भरुन देणेचे ठिकाणी वाहनचालकाने घाई न करता सभ्यपणाने वागणे वाहनचालकास बंधनकारक राहील.

४०. वाहनाची देखभाल, दुरुस्ती, रोडटॅक्स ईत्यादी वाहनासाठी लागणारा खर्च कंत्राटदारानेच करावयाचा / सोसावयाचा आहे. त्यासाठी कोणत्याही प्रकारचा दाखला किंवा प्रमाणपत्र दिले जाणार नाही. दरपत्रक उघडण्याचे दिवशी वाहतुक करण्याचे वाहन व त्याची सर्व कागदपत्रे विम्यासहीतअद्ययावत निरीक्षणासाठी हजर करावी लागतील.

Scanned with OKEN Scanner

४१.वाहतुक कंत्राटदाराचा करारनामा लिहून दिल्याच्या तारखेपासून आणि जमानत रक्कम भरल्यापासून एक वर्षापर्यंत म्हणजे १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ अखेरपर्यंत कार्यान्वीत राहील.

४२. सिंधुदुर्ग-कोल्हापूर-सिंधुदुर्गअथवा इतर कोठूनही व सिंधुदुर्ग जिल्हयांतर्गत द्रवनत्र वाहतुकीस निघताना वेळ व वाहनाचे किलोमीटर रिडिंग मीटर वर त्यावेळी दाखवित असलेला किलोमीटरचा आकडा व द्रवनत्र वाहतुकी हून परत मुख्यालयात आल्यावर आल्याची वेळ व किलोमीटर आकडायांची नोंद द्रवनत्र वाहतूक नोंदवही मध्ये वाहन चालकाने/ठेकेदाराने ज्या त्या वेळी स्वत:च्या स्वाक्षरीने नोंद करणे बंधनकारक राहील व त्यास कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी साक्षांकीत करतील.

४३. दरपत्रकामध्ये कोणतीही अट किंवा पर्याय दरपत्रकधारकास देता येणार नाही. उपकंत्राट देता येणार नाही तसेच एकापेक्षा अधिक दर नमुद करता येणार नाहीत असे झाल्यास सदर निविदा विचारात घेतली जाणार नाही.

**(डॉ. समीर चंद्रकांतराव बिलोलीकर)**
जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त,
जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय,
सिंधुदुर्ग

Scanned with OKEN Scanner